Vol II Issue XI

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.11,Dec. 2012
ISSN:-2230-7850
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# सवरकरांचा हिंदू राष्ट्रवाद

*ह. नि. सोनकांबळे*

संशोधक विद्यर्थी, राज्यशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

***गेशवारा :***

भारताची संस्कृती धार्मिक परंपरा अतिप्राचिन असून कालप्रवाहात अनेक राजकीय स्थित्यंतरणे होउनही मुलभूत वैदिक किंवा हिंदू जीवनपध्दतीत परिवर्तन घडून आले नाही. वर्णव्यवस्था किंवा विशमताआधारित उतरंडीची जीतव्यवस्था या परिघातून हिंदू समाज जीवनाची परिदृढता दिसून येते. एकोणिसाव्या शतकात मात्र ब्रिटीशांच्या आधुनिक राजवटीतून येथील पारंपारिक समाजव्यवस्थेला गतीमानता प्राप्त झाली. वसाहतवादाच्या उदारमतवादी धोरणांनी पारंपारिक समाजव्यवस्थेवर आक्रमण करताना आधुनिक भारत पाश्चात्य तत्वज्ञानाने भारावला गेला. यातूनच विषमताआधारित समाजव्यवस्थेला मानवतावादाच्या पातळीवर आणण्यासाठी बुध्दिप्रामाण्यवाद, ऐहिकवाद, विवेकवाद इ. तत्वे समाजसुधारकांनी भारतात रुजवली. प्रबोधनाच्या चळवळीने आगोदर धर्मचिकित्सा करुन हिंदुजीवनपध्दती आणि हिंदु धर्मग्रंथ यावर कठोर टीका करुन आधुनिक मुल्यावर समाताअधारित राष्ट्रवाद निर्माण करण्याची प्रक्रिया देशात सुरु झाली. या बाबतीत उदारमतवादी आणि क्रांतीकारक सुधारकांनी पुढाकार घेतला. एकोणीसाव्या शतकामध्ये हिंदुसमाजव्यवस्था आणि हिंदूधर्म यावर होणारी टिका परतवून लावण्यासाठी आणि खिश्चन, इस्लाम आणि शिखधर्माचा प्रभाव रोखण्यासाठी हिंदूत्वाची पुर्नमांडणी करणारा एक हिंदूमतप्रवाह पुढे आला. त्याचे प्रतिनिधीत्व दयानंद सरस्वती, अरविंद घोष इत्यादी धुरिणांनी केले. पुढे राष्ट्रीय चळवळीचे गठण झाल्यानंतर वसाहतवादाच्या विरोधात टिळकांनी हिंदुत्ववादाचा पुरस्कार केला. तथापी विसाव्या शतकात गांधीजींनी धर्माचा वापर राजकारणासाठी करुनही धर्म निरपेक्षतेच्या तत्वाचा पुरस्कार केला. स्वाभाविकपणे एकोणीसाव्या शतकामध्ये हिंदुत्वाचा दृढमूल झालेला विचार सावरकरांनी विसाव्या शतकात त्याची पुर्नमांडणी करुन पुढे नेला.

***प्रस्तावना :***

हिंदू धर्म जगातील अतिप्राचीन धर्म आहे. तो श्रृती, स्मृती, पुरणे इत्यादीतून आकारला आहे. हिंदू हा शब्दही पुरातन आहे. प्राचिन ग्रिक ग्रंथात त्याचा उल्लेख आहे. प्रारंभी सप्तसिंधूच्या प्रदेशात हिंदू समाजाची वस्ती होती. पारशी धर्मीयांच्या अवेस्तामध्ये या प्रदेशाला हप्तहिंदू म्हटले आहे. या हिंदूचा धर्म तो हिंदु धर्म, त्यालाच आर्य धर्म, वैदिक धर्म, सनातन धर्म किंवा वर्णाश्रम धर्म या नावाने ओळखता येते. कुणा एका व्यक्तीला साक्षातकार होउन हा धर्म उदयास आला नाही. त्यामुळे हा धर्म निश्चित केंव्हा स्थापन झाला हे सांगता येत नाही. असे असले तरी हा धर्म आपल्या वेगळया विचारावरुन, नियमावरुन व संस्कृतीवरुन ओळखला जातो. या धर्मात असलेली अतिप्रचिन जातीव्यवस्था व वर्णव्यवस्था ही या धर्माची ओळख करुन देतात नव्हे याच प्रथेवर आधारीत इथली समाजव्यवस्था असल्याने माणसामाणसात विषमता पेरली गेली. पुढे हीच विषमता पाश्चात्य शिक्षणप्रणालीने नाकारायला सुरुवात केली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांनी याच व्यवस्थेचा आधार घेवून बदल घडवण्याचा प्रयत्न केला. आणि हिंदू राष्ट्रवादाचा एक नवा विचारप्रवाह समोर आणला.

***संशोधनाची उद्दिश्टये :***

1. सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद व हिंदू धर्म यातील फरक जाणून घेणे
2. सिंधू – हिंदू ते हिदू राष्ट्रवाद या ऐतिहासीक प्रवासाचे आकलन करुन घेणे.

***संशोधन पध्दती :***

प्रस्तुत शोधनिबंधाचा अभ्यास करत असताना आदर्शवादी, वैधानिक व संस्थात्मक दृष्टीकोणातून चर्चा करण्यात आली आहे.

***सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद :***

विनायक दामोदर सावरकर आपल्या हिंदुत्व या पुस्तकाची पहिलीच ओळ लिहतात की, धाडसी आर्य लोकाची अगदी पहिली वसाहत सिंधू नदीच्या तिरावर होउन त्यांनी आपल्या होमाचा पहिला अग्नी केंव्हा जागृत केला हे नक्की नाही. असे म्हणत असतानाच पुढे ते म्हणतात की, दक्षीणेतील देशाचे नृपती हनुमान, सुग्रिव, बिभिषण यांनीही जेंव्हा प्रेम निर्भयतेने प्रभू रामचंद्राचे साम्राज्यपद मान्य केले. तोच दिवस आपल्या हिंदू जातीचा खरा जन्मदिन होय. पुढे आर्यांनी सहाजिकच स्वतःला सप्तसिंधू हे नाम धारण केले. या सप्तसिंधूचेच पुढे हप्तहिंदू झााले याचे स्पष्टीकरण करताना सावरकर म्हणतात की, संस्कृतमधील 'स' हे अक्षर कधी कधी हिंदी अथवा हिंदी व्यतीरीक्तही इतर प्राकृत भाषातून 'ह' मध्ये बदलले जाते. उदा. आपल्याकडे सप्तहाला आपण 'हप्ता' असे म्हणतो, संस्कृतमधला 'केसरी' हा शब्द जुन्या हिंदीमध्ये 'केहरी' असा होतो,

त्याचप्रमाणे 'सरस्वतीचे' रुपांतरण 'हरहरवती' होते तसेच सप्तसिंधू हया नावाचे रुपांतरण 'हप्तहिंदू' केलेले प्रत्यक्ष अढळून येते. फाहियान या चिनी प्रवाशानेही सिंधू नदीचा उल्लेख उच्चारत असताना 'हिन्तू' असा केला आहे. हिंदू धर्माविषयी आणि त्याच्या प्रचार आणि प्रसारासबंधी बऱ्याच लेखकांनी विविध विचार मांडले मात्र सावरकरांनी या विचाराला थोडेसे पुढे नेउन एक स्वतंत्र एकधर्मी राष्ट्र कसे उभे केले जाउ शकते याचा अभ्यासच सावरकरांनी आपल्या ग्रंथातून आणि विचारातून मांडण्याचा प्रयत्न केला.

सावरकरांनी मांडलेला हिंदू राष्ट्रवाद म्हणजे हिंदू धर्माच्या विरोधात उभे केलेले पहिले बंड होते. कारण सावरकरांनी हिंदू धर्म जशास तसा घेवुन हिंदू राष्ट्रवादाची मांडणी केलेली नाही. हिंदू राष्ट्रवादाची मांडणी करत असताना सावरकरांनी मुळ हिंदू धर्मातील प्रथा, परंपरा, रुढी, जातीव्यवस्था व वर्णव्यवस्था याला आपल्या विचारात कोठेच स्थान दिले नाही. या प्रथा परंपरा नाकारत असताना सावरकर आपल्या हिंदूत्व या ग्रंथात म्हणतात की, "हिंदुत्व हे हिंदुधर्माहून निराळे आहे." हिंदुत्व याचा अर्थ या शब्दार्थाशी पुष्कळ लोक समजतात तसा समान नाही. तर हिंदूधर्म हा शब्द हिंदुत्वापासून उत्पन्न झालेला अंशात्मक आणि एक व्देश दाखविणार शब्द आहे.

सावरकरांनी एक धर्मी राष्ट्र उभे रहावे या माध्यमातूनच आपले संपूर्ण लिखन केलेले आढळते म्हणूनच त्यांनी 1857 च्या राष्ट्रीय उठावाचा उल्लेख करत असताना सांगितले आहे की, हा उठाव म्हणजे भरतीय हिंदु आणि मुस्लीमांनी उचललेले राष्ट्रीयत्वाचे पहिले पाउल होते. म्हणूनच त्यांनी हिंदू राष्ट्रवादाची मांडणी करत असताना हिंदू म्हणजे कोण आणि हिंदूत्व म्हणजे काय?याचा उल्लेख करत असताना आपल्या व्यख्येत म्हणतात की,

"आसिंधुसिंधुपर्यंता यस्य भारतभूमीका
पितृभू:पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिती स्मृतः "

म्हणजेच जो जो कोणी, सिंधूपासुन समुद्रापर्यंत पसरलेली ही भारतभूमी आपली पितृभू नि पुण्यभू म्हणून मानतो नि अधिकाराने तसे सांगू शकतो तो तो हिंदू होय. अशी समर्पक व्याख्या सावरकरांनी केलेली आपल्याला दिसते.

म्हणूनच भारतात अस्तित्वात असलेला हिंदू धर्म आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद यात फरक असल्याचे दिसून येते. कारण हिंदू धर्मात नाना देवता, कर्मकांड, मुर्तीपुजा, अंधश्रध्दा जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था अशा अनेक गोष्टी असून या विज्ञानवादाला विरोध करतात. मात्र सावरकर या सर्व गोष्टींना आपल्या विचारात फारसे स्थान देत नाहीत. उलट आपल्या धर्माचा कोणीच निर्माता नाही व आपल्या धर्माला कोणताही असा धर्म ग्रंथ नसल्याचे सांगतात. म्हणूनच आपल्या राष्ट्रवादात ते व्यक्ती व्यक्ती मध्ये धर्माच्या व जातीच्या आधारावर भेदभाव मानायला तयार नाहीत. म्हणूनच ते आपल्या पायात आपण बांधलेल्या "वेदोक्त बंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, सिंधुबंदी, शुध्दिबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी " या सात बेडया तोडल्या पाहिजेत. पिढयान पिढया चालत आलेली वर्णव्यवस्था नाकारली पाहिजे. कारण "मद्रासी ब्राम्हणापेक्षा महाराष्ट्रीय चांभार गोरे असतात. महारांत चोखामेळयासारखे संत नि डॉ. आंबेडकरांसाखे विद्वान निपजतात तर उत्तर हिंदुस्थानातील शेकडो ब्राम्हण पिढीजात शेतकीचा धंदा करता करता निरक्षरचे निरक्षर राहतात. ब्राम्हण शिंप्याची, सोनाराची, कातडयाचे बूट विकण्याची दुकाने चालवितात तर शिंपी, सोनार, वाण्यात आय. ए. एस, एम. ए. पदविधर होतात." असे सांगून त्यांनी चातुवर्ण्य व्यवस्था नाकारल्याचे दिसते.

सवरकरांनी आपल्या एकंदर विचाराच्या माध्यमातून हिंदू राष्ट्रवादाची उभारणी केली असे म्हणत असलो तरी आपल्या हिंदुत्व या ग्रंथाचा शेवट करत असताना सावरकर म्हणतात की, "बावीस कोटी लोक ज्यांची हिंदुस्थान ही कर्मभुमी आहे, पितृभूमी आहे आणि पुण्यभूमी आहे असला दिव्य इतिहास ज्यांच्यामागे उभा आहे. एक रक्त आणि एक संस्कृती यांच्या सर्वसामान्य बंधनांनी जे बध्द आहेत असले हे बावीस कोटी हिंदू लोक सर्व जगाला आपले म्हणणे ऐकावयाला लावतील. असा एक दिवस उगवणार आहे, की ज्यावेळी हे सामर्थ्य जगाच्या प्रत्ययास येणार आहे. आणि हे ही तितकेच निश्चित आहे की जेंव्हा केव्हा ही अशी वेळ येईल तेंव्हा हिंदुलोक सर्व जगाला दुसरे तिसरे काही सांगणार नाहीत तर तेच जगाला करावयास सांगतील की जे गीतेने सांगितले, जे बुध्दाने उपदेशिले, ज्या वेळी हिंदु मनुष्य हा हिंदुत्वातीत होतो. त्यावेळेला तो श्रीशंकराचार्याप्रमाणे 'वाराणसी मेदिना' म्हणून गावयाला लागतो नि श्री तुकाराम महाराजाप्रमाणे 'आमुचा स्वदेश भुवनयामध्ये वास' असे गर्जुन उठतो. काय म्हणता?माझा स्वदेश?ऐका तर बंधुंनो ! माझ्या देशाच्या मर्यादा म्हणजे, त्रैलोक्याच्या मर्यादा तीच माझ्या देशाची सीमा !" असे सांगून सावरकर आपल्या राष्ट्रीयत्वाच्या शेवटच्या मुदयावर येवून सांगतात की, "माझे राष्ट्रीयत्वही मानवराष्ट्रात विलीन पावेल जर मुसलमानत्व, ख्रिश्चनत्व इत्यादी 'त्वे' इतर सोडीत असतील तर माझे हिंदुत्वही मानुशकेत विलय पावेल. जसे माझे राष्ट्रीयत्व –हिंदीपणही मानवराष्ट्रात विलय पावेल की जेंव्हा इंग्लिशपण, जर्मनपण इत्यादीपण लुप्त होउन मनुष्यपणा तेवढा जगात मनुष्यमात्रात नांदू लागेल ! आज देखील जो खरा मनुष्यवादी असेल त्याच्यापुरते त्याच्याशी देखील मी सर्व भेदभाव सोडून वागेन."

***संदर्भ :***


1. श्री. श्रीकांत जीचकर, विश्वकोश, वार्षिकी 2005, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, 2005.
2. डॉ. श. गो. कोलारकर, प्राचीन भारताचा इतिहास, श्री. मंगेश प्रकाशन, 1999.
3. स्वातंत्र्यविर सावरकर, हिंदुत्व, मनोरमा प्रकाशन, जून 2009.
4. मा. श. मोरे, तीन चिनी प्रवासी, (IN015) The corporate body of the Buddha educational foundation, Taipai, Taiwan P. 6
5. वि. दा. सावरकर, हिंदु राष्ट्रदर्शन, सहा सोनेरी पाने, जातुच्छेक निबंध भाग 1 व भाग 2, आदि प्रमुख ग्रंथासह सावरकरांनी लिहलेल्या एकंदर 27 पुस्तकांचा अभ्यासाअंती लिहलेला शोधनिबंध आहे. शब्द मर्यादा असल्याने सर्वच ग्रंथाची नावे येथे देणे शक्य होत नाही.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net